सकाळ
नाशिक, सोमवार,
११ ऑगस्ट २०१४

# डॉ. हेमा साने यांचा वसुंधरा सन्मानाने गौरव

## छायाचित्रकारांच्या पारितोषिकांचेही वितरण

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १० : पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबविण्यासाठी व निसर्गाच्या सुरक्षेसाठी नाशिककरांनी उचललेल्या पर्यावरण जागृतीच्या विड्याने आज गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या किर्लोस्कर-वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोप झाला.

येथील कुसुमाग्रज स्मारकात झालेल्या या महोत्सवाच्या आज चौथ्या दिवशी अभिनेते गिरीश ओक यांच्या हस्ते वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासिका डॉ. हेमा साने (पुणे) यांचा वसुंधरा सन्मान देऊन गौरव करण्यात आला. या वेळी व्यासपीठावर महिला उद्योजक समितीच्या सहअध्यक्षा डॉ. धनश्री हरदास, महोत्सवाचे निदेशक वीरेंद्र चित्राव व किर्लोस्करचे महाव्यवस्थापक विलास बिरारी उपस्थित होते.

एम.एस्सी., पीएच.डी. असलेल्या डॉ. साने या पुण्यात विजेचे व पाण्याचे कनेक्शन नसलेल्या घरात पन्नासहून अधिक वर्षांपासून राहत आहेत. त्यांच्याकडे संपर्क करण्यासाठी कोणताही दूरध्वनी वा मोबाईल नसून घरात नेहमी प्राणी व पक्ष्यांचा वावर असल्याचे त्यांनी उपस्थितांशी बोलताना सांगितले.

डॉ. साने म्हणाल्या, की पर्यावरणाच्या सुरक्षा व संवर्धनासाठी टाकाऊ वस्तू आणि पदार्थांचा मोठ्या प्रमाणावर पुनर्वापर करणे सर्वांसाठी हिताचे ठरेल. निसर्ग ही संपत्ती केवळ माणसाची नसून संपूर्ण प्राणिमात्राची आहे. माणसाने पृथ्वीवरील संसाधनाचा सर्वाधिक वापर केल्यामुळे ते संपण्याच्या वाटेवर आहे आणि ते पुन्हा निर्माण करता येणार नाही. सध्या आहे त्या संसाधनाचा नियोजनबद्ध वापर करणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. आपण या पृथ्वीचा आदर केला पाहिजे. सगळ्या प्राणिमात्रांबाबत आपण आदराची भावना ठेवली पाहिजे. या वेळी डॉ. साने यांनी उपस्थितांना 'सावध व्हा रे सावध व्हा, सहा 'आर' हा मंत्र नवा' यावर आधारित दृक-श्राव्य सादरीकरण केले.

श्री. ओक म्हणाले, की वाहतूक सिग्नलप्रमाणेच निसर्गदेखील आधीच पिवळा सिग्नल दाखवतो. मात्र, तो कोणीही पाहत नाही. आपण वातावरणात जात नसल्याने पूर्वीच्या लोकांना जशी निसर्गाची माहिती मिळायची त्याप्रमाणे आजच्या लोकांना नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. तरुण पिढीने निसर्गाकडे वळण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

या वेळी वसुंधरातर्फे घेण्यात आलेल्या छायाचित्र स्पर्धेतील विजेते गुरुनाथ साबळे (प्रथम), आनंद बोरा (द्वितीय) आणि वैभव चौधरी व अंकुश गोखले यांना विभागून (तृतीय) पारितोषिक देण्यात आले. त्यानंतर निसर्गावरील माहितीपट व चित्रपट दाखविण्यात आला.




नाशिक : वसुंधरा महोत्सवात रविवारी डॉ. हेमा साने यांचा वसुंधरा सन्मानाने गौरव करताना अभिनेते डॉ. गिरीश ओक. शेजारी डॉ. धनश्री हरदास, वीरेंद्र चित्राव, विलास बिरारीस. (छायाचित्र : केशव मते)

### खेड्याकडेच जावे लागणार

शहरीकरणामुळे ध्वनिप्रदूषणाची समस्याही आघाडीवर आहे. त्यामुळे शांत घरे मिळणे मुश्कील झाले आहे. अशावेळी महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' दिलेला मंत्र उपयोगी पडणार आहे. घरे तयार करताना बांधकाम साहित्याचा पुनर्वापर शक्य आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करावे, या मुद्द्यावर गेले तीन दिवस विविध वक्त्यांनी परिसंवादात भर दिला.